तपासी अधिकारी

N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**

प्रथम खबर अहवाल

**(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)**

1. **District (जिल्हा):** अहमदनगर **P.S.(ठाणे):** श्रीगोंदा

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0255 **Year (वर्ष):** 2024

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 02/03/2024 03:09

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7, 7अ |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 12 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** शुक्रवार

**Time Period (कालावधी):**

**Date From (दिनांक पासून):** 01/03/2024
**Date To ( दिनांक पर्यंत):** 01/03/2024
**Time From (वेळेपासून):** 12:09 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 16:06 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 02/03/2024 **Time (वेळ):** 02:45 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 002

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 02/03/2024 03:09 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**

पश्चिम, 15 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** लोणीव्यंकनाथ ,श्रीगोदा

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** दत्तात्रय मारूती लकडे

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1989

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | पोलीसवाडी, ताश्रीगोंदा,श्रीगोंदा,अहमदनगर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | पोलीसवाडी, ताश्रीगोंदा,श्रीगोंदा,अहमदनगर,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):**

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | सुनिलमारुती शेळके | | | 1. वाडेगव्हाण, ता पारनेर,पारनेर, पारनेर ,अहमदनगर,महाराष्ट्र, भारत |
| 2 | वैभव लहु वाळके | | | 1. बेलवंडी ,श्रीगोंदा ,श्रीगोंदा, अहमदनगर,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 1500 / रुपये रोख रक्कम | 1,500.00 |

**10 Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

1,500.00

**11. Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

**12. First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्याद दि. 02/03/2024

मी दत्तात्रय मारुती लकडे, वय 45 वर्षे, धंदा शेती, रा. पोलीसवाडी, ता.श्रीगोंदा, जि.अहमदनगर, मो. नं. 9156084602.

समक्ष फिर्याद देतो की, मी वरील पत्त्यावर कुटुंबासह राहण्यास असुन मी दि. 29/02/2024 रोजी पोलीस उप अधीक्षक श्री.लोखंडे यांना फोन करुन एका लोकसेवकाकडुन लाच मागणी होत असले बाबत तक्रार सांगितली. त्यानुसार त्यांनी मला दि. 01/03/2024 रोजी 11/00 वा चे सुमारास बेलवंडी येथे सुरक्षित ठिकाणी थांबण्यास सांगितले. त्यानुसार मी सुरक्षित ठिकाणी थांबुन होतो. सकाळी 11/00 वा. सुमारास मी थांबलो त्या ठिकाणी पोलीस उप अधीक्षक श्री. लोखंडे हे शासकीय वाहनाने तेथे आले. त्यांनी मला माझे नाव गाव विचारले तसेच त्यांची, त्यांच्या सोबतचे स्टाफ व दोन पंच यांची ओळख सांगितली. त्यावेळी श्री. लोखंडे यांनी मला पंचासमक्ष माझी तक्रार विचारली असता मी लाचमागणीची तक्रार सांगितली की, मी वरील ठिकाणी कुटुंबासह राहण्यास आहे. माझे वडिलांचे नावे पोलीसवाडी, ता.श्रीगोंदा येथे गट नं. 123/19 मध्ये क्षेत्र 0.30 हे.आर. जमिन आहे. सदर शेतजमिनीत एक विहीर असुन त्या विहीरीवर पाच एच पी पाणीपंपाचे विदुयत कनेक्षन माझे आजोबा कै. आबा उमा लकडे यांच्या नावे घेतलेले आहे. माझे शेतजमिनीलगत असलेल्या श्री. बाजीराव चोभे यांच्या शेतात विदयुत जोडणीकरीता डी.पी. (ट्रान्सफार्मर) बसविण्यात आलेली आहे. सदर डी.पी. वर आमचे पाणीपंपाचे कनेक्षन आहे. पंधरा दिवसापुर्वी डी.पी. जळाल्याने ती दि. 26/02/2024 रोजी दुरूस्त करून जोडण्यात आली होती. डी.पी.जोडण्याच्या वेळी लाईनमन षेळके व कंत्राटी वायरमन वाळके, म.रा.वि.वि. कंपनी, बेलवंडी कक्ष यांनी विदुयत पुरवठा खंडित केला म्हणुन 1500/-रुपयांची मागणी केली होती. दि. 28/02/2024 रोजी कंत्राटी वायरमन वाळके यांचा मला फोन आला होता. त्यावेळी त्यांनी माझेकडे डी.पी. जोडण्याच्या वेळी विद्युत पुरवठा खंडित केला म्हणुन त्या मोबदल्यात त्यांना व लाईनमन शेळके यांचेकरीता 1500/-रुपयांची मागणी केली व पैसे दिले नाही तर यापुढे डी.पी. बसविताना विदुयत पुरवठा खंडित करणार नाहीत असे म्हणाले. त्यावेळी कंत्राटी वायरमन वाळके हे माझेकडे लाचेची मागणी करत असल्याचे मला समजले. मला त्यांना लाच देण्याची ईच्छा नाही. आज रोजी मी वाळके यांची भेट घेणार आहे. त्यावेळी त्यांनी माझ्याकडे आमची डी.पी. जोडण्याच्या वेळी विदुयत पुरवठा खंडित केला म्हणुन लाचेची मागणी केल्यास त्यांचेविरूध्द कायदेशीर कारवाई करावी. तसेच त्यांनी माझी लाईनमन शेळके यांचेशी भेट घालुन दिल्यास शेळके यांचेशी चर्चा करणार आहे. चर्चेदरम्यान लाईनमन शेळके यांनी माझेकडे लाचेची मागणी केल्यास त्यांचेविरूध्द कायदेशीर कारवाई करावी बाबत मी तक्रार सांगीतली व माझ्या स्वहस्ताक्षरात लिहुन दिली, त्यानंतर त्यावर मी, दोन्ही पंचांनी व श्री. लोखंडे यांनी स्वाक्षरी केली.

त्यानंतर मी लोकसेवक शेळके व वाळके यांचे विरूध्द नोंदविलेल्या लाचमागणी तक्रारीची पडताळणी करण्याचे ठरले. पोलीस उप अधीक्षक श्री. लोखंडे यांनी लाचमागणी पडताळणी कारवाईत व्हाईस रेकॉर्डरचा वापर करण्यात येणार असले बाबत कळवून त्याच्या वापराबाबत माहिती समजावून सांगितली. त्यानंतर पोलीस उप अधीक्षक श्री. लोखंडे यांचे सुचनेप्रमाणे पोकॉ निमसे यांनी व्हाईस रेकॉर्डरच्या मध्ये एक नवीन मेमरीकार्ड घालून, व्हाईस रेकॉर्डर चालू करून, त्या मेमरीकार्डमध्ये काहीही रेकॉर्ड नसल्याची माझी व दोन्ही पंचाची खात्री करून दिली. त्यानंतर पोकॉ निमसे यांनी व्हॉईस रेकॉर्डर चालु करून त्यामध्ये पोलीस उप अधीक्षक श्री. लोखंडे, दोन्ही पंच व मी निवेदन केले. त्यानंतर पोलीस उप अधीक्षक श्री. लोखंडे यांनी लाचमागणी पडताळणी दरम्यान करावयाचे कारवाई बाबत मला व पंच नं.1 यांना सुचना समजावुन सांगितल्या.त्यानंतर लोकसेवक वाळके यांची भेट कोठे घ्यायची याबाबत निश्चिती करण्यासाठी वाळके यांना मी माझा मो.नं.9156084602 यावरून वाळके यांचा मो.नं. 9673114424 यावर फोन केला. त्यावेळी वाळके यांनी मला बेलवंडीला येण्यास सांगितले. तो फोन कॉल व्हॉईस रेकॉर्डरमध्ये रेकॉर्ड करण्यात आला. त्यानंतर पोकॉ निमसे यांनी व्हॉईस रेकॉर्डर चालु करून तो माझे ताब्यात दिला. पोलीस उप

अधीक्षक श्री.लोखंडे यांनी मला पंच नं 1 यांचेसह माझे दुचाकी वाहनाने बारा वाजुन नऊ मिनिटांनी रवाना केले. त्यानंतर मी व पंच नं. 1 असे बेलवंडी येथे गेलो, तेथुन आलोसे वाळके यांना फोन केला त्यावेळे वाळके यांनी लोणी व्यंकनाथ येथे असुन तेथे येण्याचे सांगितले. त्यांनतर मी व पचं 1 असे लोणी व्यंकनाथ येथे गेलो. लोणीव्यंकनाथ येथे जावुन वाळके यांचेशी फोनवर संपर्क करून त्यांची भेट घेतली. त्यावेळी वाळके यांनी डीपी जोडण्याचे वेळी वीज पुरवठा खंडीत केला होता त्या मोबदल्यात 500/- रुपये लाचेची मागणी केली. त्यानंतर मी माझे मोबाईल वरुन श्री. शेळके, लाईनमन यांचा मो.नं.8459537775 या फोनवर फोन केला त्यावेळी शेळके लाईनमन यांनी डीपी जोडण्याचे वेळी वीज पुरवठा खंडीत केल्याचे मोबदल्यात 1500/- रुपये लाचेची मागणी केली. त्यानंतर मी म्हणालो, मी काष्टीला जावुन येतो मग आल्यावर देतो. त्यानंतर मी व पचं नं. 1 असे माझे दुचाकी वाहनाने सापळा पथक थांबले तेथे परत आलो. त्यावेळी पोकॉ निमसे यांनी माझेकडे दिलेले व्हाईस रेकॉर्डर ताब्यात घेवुन बंद केले. त्यानंतर मी व पंच नं. 1 अशांनी वरील प्रमाणे हकिकत पोउपअधी श्री. लोखंडे यांना सांगितली. त्यानंतर श्री. लोखंडे यांनी पंचा समक्ष व्हॉईस रेकॉर्डरमधील ध्वनीमुद्रीत संभाषण ऐकले असता, लाचमागणी पडताळणी दरम्यान लोकसेवक वाळके व शेळके यांनी डीपी जोडण्याचे वेळी वीज पुरवठा खंडीत केल्याचे मोबदल्यात 1,500/-रुपये लाच मागणी केल्याचे निष्पन्न झाले.

त्यानंतर लोणी व्यंकनाथ येथे वाळके यांचे विरुध्द लाचेचा सापळा आयोजीत करण्याचे ठरले. दरम्यान सापळा पथकात नव्याने हजर झालेले पोलीस निरीक्षक शरद गोर्डे व त्यांचे सोबतचे अंमलदार यांची श्री. लोखंडे यांनी माझेशी ओळख करुन दिली. त्यानंतर मी माझ्या बचतीतुन 1500/-रुपये त्यात 500/- रुपये दराच्या 02 भारतीय चलनी नोटा व 100 रुपये दराच्या 05 नोटा हजर केल्या. पोउपअधी.श्री. लोखंडे यांनी सदर सापळा कारवाईमध्ये अॅन्थ्रासिन पावडर व अल्ट्राव्हायलेट दिव्याचा वापर करण्यात येणार असल्याचे सांगुन त्याबाबतचे प्रात्यक्षिक करून दाखविण्यात आले. मी हजर केलेल्या नोटांचे नंबर लिहुन घेण्यात आले. त्यानंतर त्या नोटांना अॅन्थ्रासिन पावडर लावण्यात आली व सदर लाच रक्कम माझ्या ताब्यात दिली. त्यानंतर पो.उपअधी.श्री. लोखंडे यांनी सापळा कारवाईबाबत मला व सापळा पथकास आवश्यक त्या सुचना दिल्या व लाच स्वीकारल्यानंतरचा नियोजीत शारा ठरवुन दिला. त्यानंतर पोकॉ निमसे यांनी व्हॉईस रेकॉर्डरमध्ये नवीन मेमरी कार्ड टाकले. त्यानंतर पोकॉ निमसे यांनी व्हॉईस रेकॉर्डर चालु करुन माझ्या ताब्यात दिला व पंच क्र. 1 सह मला माझे दुचाकी वाहनाने वाळके यांनी मागणी केलेली लाच रक्कम त्यांना देण्यासाठी लोणी व्यंकनाथ येथे दुपारी तीन वाजुन पस्तीस मिनीटे वाजण्याच्या सुमारास रवाना केले. लोणी व्यंकनाथ येथील अप्पु पान शॉप समोर गेल्यावर सापळा पथक आमचे मागोमाग त्या ठिकाणी येवुन सापळा लावुन थांबले. त्यानंतर मी माझे फोन वरुन वाळके वायरमन यांना फोन केला व अप्पु पान शॉप येथे आलो असले बाबत कळविले असता, वाळके वायरमन यांनी मी तेथे दहा ते पंधरा मिनिटात येतो असे सांगितले त्यामुळे मी व पंच नं. 1 अप्पु पान शॉप जवळ थांबुन होतो. त्यानंतर थोडयाच वेळात तेथे वाळके वायरमन यांचा फोन आला त्यावेळी मी त्यांना अप्पु पान शॉपजवळ येण्यास सांगितले, थोडयाच वेळात तेथे वाळके आले, त्यावेळी मी त्यांच्यासमोर लाच रक्कम धरली व मोजुन घ्या म्हणालो त्यावेळी वाळके यांनी लाच रक्कम स्विकारुन ती त्यांनी त्यांच्या हातात ठेवली, त्यावेळी मी शेळके यांना माझ्या फोनवरुन फोन केला व तुम्ही म्हणले तेवढे 1500/- रुपये मी वाळकेकडे दिले त्यावेळी शेळके म्हणाले, बर बर ठिक आहे असे म्हणाले, त्यावेळी मी त्यांना म्हणालो, वाळकेंशी बोला असे बोलुन वाळकेकडे मी फोन दिला त्यावेळी वाळके त्यांना म्हणाले 'हा घेतले मी' असे म्हणाले, त्यानंतर फोन बंद केला. त्यावेळी मी लाच रक्कम स्विकारल्याचा सापळा पथकास नियोजीत शारा केला त्यावेळी सापळा पथकाने वाळके वायरमन यांना लाच रक्कमेस चार वाजुन पाच मिनिटे वाजण्याच्या सुमारास रंगेहात पकडले.

त्यानंतर पोलीस उप अधीक्षक श्री. लोखंडे यांनी पंच नं. 2 च्या मदतीने लाच रक्कम वाळके यांचेकडुन ताब्यात घेतली. त्यानंतर सापळपुर्व पंचनाम्याच्यावेळी लिहुन घेतलेल्या लाचेच्या नोटांचे नंबर व वाळके यांचेकडुन ताब्यात घेतलेल्या नोटांच्या नंबर पाहणी केली असता, ते नंबर एकच असल्याची खात्री झाली. त्यानंतर श्री. लोखंडे यांनी वाळके यास त्याचे नाव गाव विचारले असता त्याने त्याचे नाव वैभव लहु वाळके, वय 22 वर्षे, नेमणुक बाह्यस्त्रोत तंत्रज्ञ, बेलवंडी कक्ष अंतर्गत लोणी गाव, राहणार बेलवंडी ता. श्रीगोंदा, जि. अहमदनगर असे सांगितले. त्यानंतर तेथील जवळच असलेल्या हॉटेल शिवम मध्ये जावुन हॉटेल मालकास एक रुम उपलब्ध करुन देण्यास विनंती केली असता त्यांनी एक रुम उपलब्ध करुन दिली. त्यानंतर वाळके यांचे ताब्यातुन पंच नं. 2 करवी ताब्यात घेतलेल्या लाच रक्कमेची व वाळके यांचे हाताच्या तपासणी करण्यात आली. त्यानंतर पो.उपअधी.श्री लोखंडे यांचे सुचनेप्रमाणे पो.नि. गोर्डे व त्यांचे पथकासोबत मी लोकसेवक शेळके यांचा षोध घेतला, शेळके मिळुन आल्यानंतर पोनि गोर्डे यांनी त्यांना ताब्यात घेवुन कुकडी विश्रामगृह, श्रीगोंदा येथे श्री. लोखंडे यांचे समक्ष हजर केले, त्यानंतर श्री. लोखंडे यांनी पंचासमक्ष त्यांना त्यांचे नाव गाव विचारले असता, त्यांनी त्यांचे नाव सुनिल मारुती शेळके, वय 45 वर्षे,

नेमणुक प्रधान तंत्रज्ञ, बेलवंडी कक्ष रा. वाडेगव्हाण, ता. पारनेर, जि. अहमदनगर असे सांगितले.त्यानंतर श्री. लोखंडे यांनी विचारलेवरून मी त्यांना सापळा कारवाई दरम्यान घडलेल्या हकीकतीबाबत सांगितले.
तरी दिनांक 01/03/2024 रोजी लाचमागणी पडताळणीच्या वेळी 12/09 वा. ते 13/09 वाजेच्या दरम्यान लोकसेवक 1) सुनिल मारुती शेळके, वय 45 वर्षे, नेमणुक प्रधान तंत्रज्ञ, बेलवंडी कक्ष, राहणार वाडेगव्हाण, ता. पारनेर, जि. अहमदनगर, 2) वैभव लहु वाळके, वय 22 वर्षे, नेमणुक बाहयस्त्रोत तंत्रज्ञ, बेलवंडी कक्ष अंतर्गत लोणी गाव, राहणार बेलवंडी ता. श्रीगोंदा, जि. अहमदनगर यांनी आमची डीपी जोडण्याचे वेळी वीज पुरवठा खंडीत केल्याच्या मोबदल्यात 1500/- रुपये लाचेची मागणी करुन दि. 01/03/2024 रोजी यशस्वी सापळा कारवाईच्या वेळी 16/06 वा. सुमारास वैभव लहु वाळके यांनी सुनिल शेळके यांचे सांगण्या वरुन त्यांचेकरीता माझ्याकडुन पंचासमक्ष 1500/-रुपये लाच रक्कम स्विकारली म्हणुन माझी त्यांचे विरुध्द फिर्याद आहे.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):
DNYANESHWAR BHAGWAN BHOSALE(I (Inspector)) / BOBN67347 **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):**

15. **Date and time of dispatch to the court**
**(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):**

**Signature of Officer in charge, Police Station**
**(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)**

**Name (नाव):** DNYANESHWAR BHA
**Rank(पद):** I (Inspector)
**No.(सं.):** POBN67347